# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________
   (Name) ____________________
2. (Signature) ____________________
   (Name) ____________________

OMR Sheet No. : ..............................................
(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.____________________
(In words)

| D | 3 | 8 | 1 | 3 |
|---|---|---|---|---|

Time : **2 ½** hours] [Maximum Marks : **150**

Number of Pages in this Booklet : **12**

Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means such as change of response by scratching or using white fluid, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and Original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. इस पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण :** Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, जैसे कि अंकित किये गये उत्तर को मिटाना या सफेद स्याही से बदलना तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई नकारात्मक अंक नहीं हैं ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – III
## प्रश्नपत्रिका – III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are compulsory.

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **(75)** (**पंच्यात्तर**) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2) गुण** आहेत. **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

**1.** महानुभाव पंथातील 'आचारस्थल' यां ग्रंथाचा कर्ता कोण ?

(A) केशवबास

(B) आनोबास

(C) महीमभट्ट

(D) गुर्जर शिवबास

**2.** 'तृतीय शोधनीचा टीप' हा दत्तराज मराठे यांचा ग्रंथ असून तो हरिराज पुसदेकरांच्या 'द्वितीय शोधनी'च्या टीपग्रंथाची परिवर्धित आवृत्ती म्हणता येईल

(A) संपूर्ण विधान चूक

(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**3.** "मराठीत मायावादी अद्वैत सिद्धांताची विवेचनात्मक मांडणी करणारा पहिला ग्रंथ" असे गौरवोद्गार लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कोणत्या ग्रंथाविषयी काढले आहेत ?

(A) अमृतानुभव

(B) विवेकसिंधू

(C) यथार्थदीपिका

(D) गीतार्णव

**4.** 'न लगे धूम्रपान । पंचाग्निसाधन ।
करिता चिंतन । हरी भेटे ।।'
हे उद्गार कोणाचे ?

(A) चोखामेळा

(B) संत सेना

(C) नरहरी सोनार

(D) सावता माळी

**5.** पुढील बखरी कालक्रमानुसार लिहा.

(A) तालिकोटची बखर, सभासदाची बखर, पानिपतची बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र

(B) सप्तप्रकरणात्मक चरित्र, सभासदाची बखर, तालिकोटची बखर, पानिपतची बखर

(C) पानिपचती बखर, सभासदाची बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र , तालिकोटची बखर

(D) सभासदाची बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र, पानिपतची बखर, तालिकोटची बखर

**6.** "धन्य वंश एकेक पुरुष कल्पवृक्ष पिकले" हा पोवाडा कोणाचा ?

(A) प्रभाकर

(B) होनाजी

(C) रामजोशी

(D) सगनभाऊ

7. पुढील ग्रंथांपैकी निरंजनमाधव यांचा ग्रंथ कोणता ?
(A) जैमिनी अश्वमेध
(B) प्रल्हादविजय
(C) संप्रदाय-परिमळ
(D) कर्मतत्त्व

8. कवितासंग्रह आणि कवयित्री यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | बारशाला निघाली, लग्नाला पोचली | i. | इंदिरासंत |
| b. | अंगतपंगत | ii. | मालती नांदापूरकर |
| c. | सुंदर जग हे | iii. | इंदिरा कुल्कर्णी |
| d. | शिवगीतांजली | iv. | इंदिरा अत्रे |
| | | v. | अरुणा ढेरे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | i | v | iv |
| (B) | i | ii | iii | iv |
| (C) | v | iii | iv | ii |
| (D) | ii | iii | iv | v |

9. पुढीलपैकी ना.ग. गोरे यांचा लेखसंग्रह कोणता ?
(A) रूपरंग
(B) अनगड मोती
(C) गुलबशी
(D) दीपमाळ

10. लेखक आणि टोपणनावे यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | रा.ग. गडकरी | i. | भाऊ महाजन |
| b. | अनंत हरी गद्रे | ii. | दीडश हाणा |
| c. | गोविंद विठ्ठल कुंटे | iii. | समतानंद |
| d. | द.रा. बेंद्रे | iv. | पुणेकर |
| | | v. | अंबिकातनय दत्त |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | iv | iii | i |
| (B) | ii | iii | i | v |
| (C) | v | iv | iii | ii |
| (D) | iii | i | iv | v |

11. नाट्यमन्वंतरच्या स्थापनेमागील चार प्रमुख नावे कोणती ?
(A) आचार्य अत्रे, अनंत काणेकर, के.नारायण काळे, श्री.वि. वर्तक
(B) के.नारायण काळे, डॉ. ग.य. चिटणीस. अनंत काणेकर, श्री. वि.वर्तक
(C) आचार्य अत्रे, के.नारायण काळे, भा.वि. वेररकर, अनंत काणेकर
(D) के.नारायण काळे, अनंत काणेकर, श्री. वि. वर्तक, भा.वि. वेररकर

12. पुढीलपैकी कोणता कथासंग्रह अंबिका सरकार यांचा आहे ?
(A) प्रतीती
(B) चंदन
(C) चाहूल
(D) टिंबे

13. पुढीलपैकी कोणते लेखन गंगाधर गाडगीळ यांचे नाही ?
(A) प्रारंभ
(B) लिलीचेफूल
(C) दुर्दम्य
(D) गंधर्वयुग

14. मानवी भाषा एका पिढीवासून दुसऱ्या पिढीपर्यंत कशा प्रकारे संक्रमित होते ?
(A) आनुवांशिक रीतीने
(B) सामाजिक – सांस्कृतिक जीवनाद्वारे
(C) प्राण्यांच्या संदेशवहनपद्धतीनुसार
(D) वर्तननियंत्रण प्रक्रियेतून

**15.** भाषाकुलांतील जननसंबंध शोधत आपण जसजसे मागे जाऊ तसतशी भाषांची व भाषाकुलांची संख्या कमी होत गेली पाहिजे. कारण –

(A) भाषाकुलांसंबंधीची परिस्थिति अतिशय गुंतागुंतीची असते.

(B) भाषाकुलांची संख्या फार मोठी आहे.

(C) ‘जनन’ ही संकल्पना मानवी कुलांप्रमाणे भाषाकुलांना तंतोतंत लागू पडत नाही.

(D) आदिभाषेच्या अस्तित्वाचा कुठलाही पुरावा नाही.

**16.** केवळ विशिष्ट स्वनाशी संबंधित सूरच नव्हे तर संपूर्ण शब्दाची, म्हणजे त्यातील सर्व स्वनांची सुरावट हीसुद्धा काही भाषांत कोणते कार्य करते ?

(A) बलाघाताचे कार्य करते.

(B) स्वनिमिक कार्य करते.

(C) भेदनिर्धारणाचे कार्य करते.

(D) भाषेच्या संरचनेचे कार्य करते.

**17.** स्वनिमांच्या जुळणीमधून पदिम घडतात आणि पदिमांच्या जुळणीमधून वाक्ये घडतात.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान चूक

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**18.** दुहिता-कन्या-मुलगी-पोरगी-पोर-लेक-पोरटी या शब्दांतून कोणत्या प्रकारचा अर्थ व्यक्त होतो ?

(A) भावपर अर्थ

(B) सांकल्पनिक अर्थ

(C) गुणव्यंजक अर्थ

(D) शैलीगत अर्थ

**19.** दार, खोर, गी, गिरी यांसारखे परसर्ग आणि बे सारखा उपसर्ग मराठीने कोणत्या भाषेतून आत्मसात केले ?

(A) हिंदी

(B) उर्दू

(C) फारसी

(D) अरबी

**20.** मुकुलभट्टाचा ‘अभिधावृत्तिमातृका’ हा ग्रंथ काव्यशास्त्रावर नाही, तथापि, त्यातील लक्षणावृत्तीचे विवेचन या शास्त्रात बहुतांशी स्वीकृत झाले आहे.

(A) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

**21.** वाङ्मय हे स्वभावोक्ती, रसोक्ती आणि वक्रोक्ती असे तीन प्रकारचे असून त्यांपैकी रसोक्ती ही सर्वांत अधिक मनोहारी असते, असे कोणी म्हटले आहे ?

(A) विश्वनाथ

(B) मम्मट

(C) भोज

(D) भामह

**22.** महिमभट्टाने प्रतिभेचे विस्तृत विवेचन कोणत्या ग्रंथात केले आहे ?

(A) व्यक्ति विवेक

(B) तत्त्वोक्ति कोश

(C) काव्यप्रकाश संकेत

(D) काव्यानुशासन

**23.** 'उचितरचनासन्निवेश' हे काव्यसौंदर्याचे तत्त्व कोणी सांगितले ?

(A) क्षेमेंद्र

(B) भट्टनायक

(C) वामन

(D) अभिनवगुप्त

**24.** रसाचा खरा आस्वाद नाट्यानच घेता येतो, ही आग्रही भूमिका कोणाची ?

(A) वाग्भट

(B) भरत

(C) अभिनवगुप्त

(D) आनंदवर्धन

**25.** 'साहित्यकृतीचा सौंदर्यात्म अर्थ हा वाचक/समीक्षकाच्या सहसर्जक आस्वादक प्रक्रियेत व समीक्षाव्यापारात निर्माण होत असतो', ही साहित्यकृतीच्या स्वरूपाविषयीची भूमिका कोणाची ?

(A) प्रभाकर पाध्ये

(B) माधव आचवल

(C) वा.ल. कुणकर्णी

(D) गंगाधर पाटील

**26.** "मी संहिता निर्माण करतो म्हणून मी अस्तित्वात आहे आणि काही अंशी मी निर्माण करतो. ती संहिता मीच असतो" हे उद्‌गार कोणाचे ?

(A) रोमान इनगोर्दन

(B) रॉबर्ट श्कोल्स

(C) रेने वेलेक

(D) रेमंड विल्यम्स

**27.** मानसनिष्ठ कला (सायकॉलॉजिकल आर्ट्‌स) आणि साक्षात्कारी कला (व्हिजनरी आर्ट्‌स) असेकलांचे प्रकार कोणी केले ?

(A) सिग्मंड फ्रॉईड

(B) कार्ल युंग

(C) सुझन लँगर

(D) नॉर्थ्रप फ्राय

**28.** सिद्धान्तन आणि शास्त्रवेत्ते यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| a. प्रतीक मीमांसा | i. मॉड बॉडकिन |
| b. संज्ञामीमांसा | ii. एरिक नॉयमान |
| c. आदिबंधात्मक शोध | iii. एर्न्स्ट कासीरर |
| d. मानसशास्त्रीय सिद्धान्तन | iv. गास्तों बेशलार |
| | v. जेम्स फ्रेझर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | iii | iv |
| (B) | iii | iv | i | ii |
| (C) | v | iii | i | ii |
| (D) | v | iv | iii | ii |

**29.** वक्ता, श्रोता शब्दरूप-अभिप्राय, संदर्भ, संपर्कसाधन व व्याकरणिक नियमव्यूह ही भाषिक सहा अंगे कोणी सांगितली ?

(A) रोमान याकबसन

(B) जोनाथन कलर

(C) रोलाँ बार्न्‌स

(D) आनंद कुमारस्वामी

**30.** साहित्यप्रकार ही साहित्याची कृचिय व्यवस्था असून ती प्रतिभेच्या उन्मुक्त आविष्काराला अटक घालत असते

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**31.** कथा व कादंबरी यांत भेद उत्पन्न करणारा सर्वात महत्त्वाचा घटक कोणता ?

(A) रचनेचें एककेंद्रित्व व बहुकेंद्रित्व

(B) व्यक्तिचित्रणाचा तपशील

(C) दोहोंच्या अखेरीचा परिणाम

(D) अंशात्मक व व्यापक जीवनचित्रण

**32.** शोकात्मिकेचे आत्मतत्त्व कोणते ?

(A) व्यक्तिरेखांची मानसिकता

(B) कथानकाची रचना

(C) प्रमुख पात्रांची विवशता

(D) शोकात्म प्रमाद

**33.** काव्यविषयक ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. काव्य आणि काव्योदय | i. विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| b. संस्कृत काव्यपंचक | ii. मं.वि. राजाध्यक्ष |
| c. आधुनिक कविपंचक | iii. ग.त्र्यं. माडखोलकर |
| d. पाच कवि | iv. वा.गो. आपटे |
| | v. वा.ब. पटवर्धन |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | v | iv |
| (B) | iv | iii | ii | i |
| (C) | iii | v | iv | iii |
| (D) | v | i | iii | ii |

**34.** 'मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वतःवर व बाह्यविश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती वा तो आविष्कार संस्कृति होय.' ही संस्कृतीची व्याख्या कोणाची ?

(A) श्रीधर व्यंकटेश केतकर

(B) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(C) पु.ग. सहस्रबुद्धे

(D) इरावती कर्वे

**35.** प्रतिकूल स्थितीत शैव, वैष्णव आणि सूफी पंथांतील विविध धर्ममतांचा समन्वय साधून स्वधर्माची विस्मृती होऊ न देणे हे महत्त्वाचे कार्य कोणत्या पंथाने केले ?

(A) नाथ संप्रदाय

(B) आनंद संप्रदाय

(C) दत्त संप्रदाय

(D) वीरशैव संप्रदाय

**36.** अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न करण्यासाठी आंबेडकर-पूर्व काळात 'अनार्यदोषपरिहारक मंडळा'ची स्थापना कोणी केली ?

(A) गोपाळबुवा वलंगकर

(B) गणेश आकाजी गवई

(C) शिवराम जानबा कांबले

(D) तुकाराम तात्या पडवळ

**37.** उदारमतवादाचा पहिला उच्चार बाळशास्त्री जांभेकर यांच्या लेखनातून झाला; नंतरच्या काळात त्याच वाटेने पुढे जाताना सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार करणोर व उदारमतवादी विचारसरणीसाठी आधारभूमी मिळवून देणारे विचारवंत कोण ?

(A) गोपाळ हरि देशमुख

(B) महादेव शिवराम गोळे

(C) महादेव गोविंद रानडे

(D) रामकृष्ण गोपाळ भांडारकर

**38.** मराठी भाषेत शालोपयोगी पुस्तके तयार करवून घेण्याच्या बाबतीत बॉम्बे नेटीव्ह स्कूलबुक आणि स्कूल सोसायटी यांच्या बरोबरीने कोणाची कामगिरी तितकीच महत्त्वाची आहे ?

(A) कॅप्टन जॉर्ज जर्विस

(B) कॅप्टन डेविड केपन

(C) व्हॅन्स केनेडी

(D) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

**39.** 'एन्कीच्या राज्यात' या कादंबरीवर कोणत्या तत्त्वप्रणालीचा प्रभाव आढळतो ?

(A) उत्तर आधुनिकतावाद

(B) उत्तर संरचनावाद

(C) अस्तित्ववाद

(D) आधुनिकतावाद

**40.** वैज्ञानिक प्रगतीच्या प्रसाराला मिळणारा प्रतिसाद कोणत्या स्वरूपाचा आहे ?

(A) विज्ञान साहित्याची निर्मिती

(B) चंगळवादी वृत्तीचे प्राबल्य

(C) जुन्या न नव्या पिढ्यांतील मतभेदांत वाढ

(D) पारंपरिक विचारसरणीचा हिरीरीने पुरस्कार

**41.** पारंपरिक साचेबंद वाङ्मयविश्वाचा प्रतिकार करण्यासाठी कोणती उपाययोजना केली गेली ?

(A) साहित्यजगतातील तथाकथित श्रेष्ठींचा निषेध

(B) ताज्या दमाच्या वाङ्मयाभिव्यक्तीसाठी नव्या लघुनियतकालिकांची निर्मिती

(C) समांतर साहित्यसंमेलनाचे संयोजन

(D) सकस साहित्यनिर्मितीसाठी कार्यशालांचे आयोजन

**42.** 'ज्या तत्त्वांचे अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रे अधिकाधिक सुधारत चालती आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्ही आनंदाने तयार झाले पाहिजे. असे करण्यात त्यास लोकमताविरुद्ध जावे लागणार आहे. तरी जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, त्याने क्षुद्र लोकांच्या अवकृपेला यत्किंचित न भिता आपल्या मनास योग्य वाटेल ते लिहाने, बोलावे व सांगावे.'

हे विचार कोणी व्यक्त केले आहेत ?

(A) गोपाळ गणेश आगरकर

(B) विठ्ठल रामजी शिंदे

(C) विनायक दामोदर सावरकर

(D) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**43.** इ.स. १८३२ ते १८४९ या कालखंडात समाजप्रबोधन विषयक कार्य बाळशास्त्री जांभेकर, जनार्दन वासुदेवजी व भाऊ महाजन यांनी केले आणि त्यांना 'एक कोकणस्थ' व लोकहितवादी या पत्रलेखकांनी मोलाचे सहकार्य दिले.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**44.** 'पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगांप्रमाणे अनेक ठिकाणी व जातींत पसरली आहे, त्यामुळे किती कोट्यवधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसकसे भोगीत असतील, व भोगितात व त्यापासून कसकसे अनर्थ होत आहेत व होत असतील याची कल्पना सुद्धा करिता येत नाही'

हे विचार कोणाचे ?

(A) लोकहितवादी

(B) जोतीराव फुले

(C) ताराबाई शिंदे

(D) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**45.** "भाषा शुद्ध व सरळ असली तरी किताबासहित कर्त्याचें नांव प्रसिद्ध करण्याइतकी प्रौढता व रसिकता तींत नसून विचाराविषयी धरसोड व मळमळीतपणा दिसून येतो." हे विधान कोणत्या नियतकालिकाने कोणत्या नियतकालिकाविषयी म्हटले आहे ?

(A) 'दंभहारका' ने – 'निबंधमाले' विषयी

(B) 'निबंधमाले' ने – 'दंभहारका' विषयी

(C) 'विविधज्ञान विस्तार' ने – 'निबंधमाले' विषयी

(D) 'निबंधमाले' ने – 'विविध ज्ञानविस्तार' विषयी

**46.** 'ग्रंथव्यवहार : काही कच्चे दुवे' हा विभाग कोणत्या नियतकालिकाने प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली ?

(A) अभिरुची

(B) सत्यकथा

(C) छंद

(D) प्रतिष्ठान

**47.** 'गांधीहत्या' या विषयाचा सांगोपांग उहापोह करणारी लेखमाला कोणत्या नियतकालिकातून प्रसिद्ध झाली ?

(A) युगवाणी

(B) अभिरुची

(C) पंचधारा

(D) सत्यकथा

**48.** केशवसुतांनी लिहिलेली 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही कविता प्रथम कोणत्या नियतकालिकात प्रसिद्ध झाली ?

(A) मनोरंजन

(B) प्रभाकर

(C) दर्पण

(D) केसरी

**49.** पुढील कलाकृती प्रकाशनाच्या कालानुसार लिहा.

(A) आठवणींचे पक्षी, धग, सूड, कोसला

(B) धग, कोसला, सूड, आठवणींचे पक्षी

(C) कोसला, धग, आठवणींचे पक्षी, सूड

(D) सूड, कोसला, धग, आठवणींचे पक्षी

**50.** 'बळी' कादंबरीतील गिरणी कामगारांचा 'लाल बावट्याचा' नेता कोण ?

(A) वंगडी साहेब

(B) बोंगाळे साहेब

(C) बारणे साहेब

(D) सोमदत्त

**51.** 'अप्रगत, असंस्कृत, अविकसित लोकसमूह म्हणजे लोक' ही व्याख्या कोणत्या ग्रंथात आढळते ?

(A) एनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस

(B) एनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका

(C) स्टडी ऑफ फोकलोर

(D) स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोर

**52.** 'ॲनाल्स ॲन्ड ॲन्टिक्विटिज ऑफ राजस्थान' हा जेम्स टॉड यांचा ग्रंथ केव्हा प्रकाशित झाला ?

(A) १८२९

(B) १८५८

(C) १८६७

(D) १८७२

**53.** पुढीलपैकी कोणता ग्रंथ डॉ. रा.चिं. ढेरे यांचा नाही ?

(A) लोकसंस्कृतीचे उपासक

(B) लोकदैवतांचे विश्व

(C) लोकसाहित्य : काही अनुबंध

(D) लोकसाहित्य कलाविचार

**54.** 'झारीतला शुक्राचार्य' ही लोकोक्ती केव्हा वापरली जाते ?

(A) जोरजोराने बडबड करणाऱ्या व्यक्तीच्या संदर्भात

(B) टोमणा मारणाऱ्या व्यक्तिच्या संदर्भात

(C) एखादी व्यक्ती चांगल्या कामात अडथळा करीत असल्यास

(D) चुगली करणाऱ्या व्यक्तीच्या संदर्भात

**55.** ऐका कारभारी, जाऊ द्या माहेरी
रोज रोज मारस हाई तुमनी म्हातारी
ऐक वं सुंदरी वको जाऊ माहेरी
तुना बिगर करमत नही वं या घरी
चूल फुकी फुकी डोकं उनं मनं दुखी
घरे झाडी-झाडी कंबर गयं दुखी
भांडा घासी घासी हात गया दुखी
तरीबी फटफट करंस हाई तुमनी म्हातारी
ऐका कारभारी, जाऊ द्या माहेरी.

वरील लोकगीतातून ध्वनित होणारा प्रधान अर्थ कोणता ?

(A) नवरा-बायकोचे भांडण

(B) सासूविषयीची तक्रार

(C) नवऱ्याचे बायको विषयीचे प्रेम

(D) संसारी स्त्रीच्या व्यथा

**56.** "तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट प्रवृत्ती किंवा वाङ्मयीन शोधाची शाखा, की जिच्यात अतिराष्ट्रीय (सुप्रानॅशनल) जुळवाजुळवीचा पद्धतशीर अभ्यास समाविष्ट आहे असे समजले जाते." तौलनिक साहित्याभ्यासाचे हे स्वरूपवर्णन कोणी केले ?

(A) हेन्री रेमाक

(B) एस.एस. प्रॉवर

(C) क्लॉडिओ ग्युलियन

(D) इजाज अहमद

**57.** प्रभव आणि प्रभाव यांच्या संदर्भातील सहजसाधर्म्याचे स्पष्टीकरण देताना पुढीलपैकी कोणता प्रकार पुरेसा उपयुक्त ठरत नाही ?

(A) मानसशास्त्रीय स्पष्टीकरण

(B) मानव्यविद्याधिष्ठित स्पष्टीकरण

(C) वाङ्मयेतिहासाधिष्ठित स्पष्टीकरण

(D) विज्ञानाधिष्ठित स्पष्टीकरण

**58.** 'पुराव्याच्या आधाराशिवाय भारतीय साहित्यात स्वयंसिद्ध एकता शोधण्याचा खटाटोप करू नये' असा इशारा कोणी दिला आहे ?

(A) व्ही.के. गोकाक

(B) गणेश देवी

(C) मीनाक्षी मुखर्जी

(D) गायत्री चक्रवर्ती स्पिवॅक

**59.** शब्दशः भाषांतर (मेटॅफ्रेज), आशयानुगामी भाषांतर (पॅराफ्रेज), आणि अनुकृतिरूप भाषांतर (इमिटेशन) हे भाषांतराचे तीन प्रकार कोणी केले आहेत ?

(A) मॅथ्यू आर्नोल्ड

(B) जॉन ड्रायडन

(C) एस.टी. कोलरिज

(D) आय.ए. रिचर्ड्स

**60.** के.ना. काळे, डॉ. ग.य. चिटणीस, अनंत काणेकर, श्री वि. वर्तक ही 'इब्सेनिझम'ने भारावलेली मंडळी होती आणि त्यांना पाश्चात्त्य रंगभूमीवरची क्रांती मराठी रंगभूमीवर आणावयाची असल्यामुळे त्यांनी 'घोस्ट्स', 'द वाइल्ड डक' व 'ब्रान्द' ही नाटके प्रयोगस्वरूपात आणली.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान चूक

(D) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

**61.** स्त्रीत्त्वाकडे एक स्थितीम्हणून पाहणारी स्त्रीवादी विचारवंत कोण ?

(A) एलेन शोवॉल्टर

(B) सीमॉन द बॉव्ह

(C) ज्युलिया क्रिस्तेवा

(D) केट मिलेट

**62.** स्त्रीवादी साहित्य समीक्षा पारंपरिक सामाजिक व सांस्कृतिक विचारसरणीने स्त्रीवर साहित्यकृतींमधून केलेल्या अन्यायाचा शोध घेणे, त्याचप्रमाणे साहित्यकृतींच्या रुपबंधाचे त्यातील आशयाशी असणारे नाते सुस्पष्ट करते.

(A) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान चूक

**63.** कथासंग्रह व स्त्री कथाकार यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. गजगे | i. सुधा नखणे |
| b. संसारशोभा | ii. वसुंधरा पटवर्धन |
| c. कातरवेळी | iii. ज्योत्स्ना देवधर |
| d. कालचक्र | iv. विजया जहागिरदार |
| | v. अंबिका सरकार |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iii | ii | i | iv |
| (B) | iv | ii | i | v |
| (C) | v | iii | ii | i |
| (D) | i | ii | iii | iv |

**64.** 'स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री', हा ग्रंथ कोणाचा ?

(A) गीता साने

(B) सुनीती पुंगलिया

(C) प्रतिभा रानडे

(D) चंद्रकला हाटे

**65.** आत्मचरित्रात्मक लेखन व लेखिका यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. अश्रूंचे नाते | i. मथुताई आठल्ये |
| b. मी नरसाबाई | ii. विद्यादेवी परचुरे |
| c. वंचिता | iii. मेघा किराणे |
| d. चंद्रकला हाटे | iv. मीना देशपांडे |
| | v. सरस्वतीबाई अकलूजकर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iii | ii | i | v |
| (B) | v | ii | iii | i |
| (C) | iv | iii | ii | i |
| (D) | i | ii | iii | iv |

**66.** 'ग्रामीण साहित्य म्हणजे खेडेगावातील कृषीवर निर्वाह असलेल्या शेतमजुरांच्या जीवनावर आधारलेले साहित्य होय' हे मत कोणाचे ?

(A) गो.म. कुलकर्णी

(B) नागनाथ कोत्तापल्ले

(C) वासुदेव मुलाटे

(D) आनंद यादव

**67.** बळीबा पाटील ही कादंबरी 'दीनमित्र' मध्ये कोणत्या वर्षी क्रमशः प्रसिद्ध झाली ?

(A) १९०५

(B) १८५६

(C) १९०३

(D) १८८८

**68.** पुढील कवितासंग्रह व कवी यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | बोबडे बोल | i. | भास्कर बढे |
| b. | आभाळाचं दान | ii. | शाम कुलकर्णी |
| c. | गवळणी | iii. | गणेश कुळे |
| d. | गंधवीणा | iv. | पांडुरंग श्रावण गोडबोले |
| | | v. | गजमल माळी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | iii | ii | v |
| (B) | v | ii | iii | i |
| (C) | iii | i | iv | ii |
| (D) | ii | iv | i | iii |

**69.** 'घरजावई' हा कथासंग्रह कोणाचा ?

(A) द.मा. मिरासदार

(B) शंकर पाटील

(C) आनंद यादव

(D) रा.रं. बोराडे

**70.** तमाशातील नाचणाऱ्या स्त्रियांचा पडद्याभागील आयुष्याचा वेध पुढीलपैकी कोणत्या कादंबरीत आढळतो ?

(A) मंधान

(B) पाचकू

(C) मेलेलं पाणी

(D) भंडारभोग

**71.** 'दलित साहित्य म्हणजे दलितांनी किंवा दलितांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे, तर दलित संवेदनेतून जन्मलेले साहित्य होय'. हे मत कोणाचे ?

(A) गंगाधर पानतावणे

(B) बाबुराव बागूल

(C) भालचंद्र फडके

(D) गो.पु. देशपांडे

**72.** पुढीलपैकी 'दलितानंद' या नावाने कोणी लेखन केले ?

(A) अण्णाभाऊ साठे

(B) गोविंद आबाजी अहिरे

(C) भाऊ फक्कुड

(D) दीनबंधु शेगावकर

**73.** पुढीलपैकी विमल गाडेकर यांचा कविता संग्रह कोणता ?

(A) ऋतुबंध

(B) भावपल्लवी

(C) उगवतीचे शब्द

(D) प्रकाशाची वाट

**74.** जोड्या लावा-कवी आणि कवितासंग्रह ?

| | | | |
|---|---|---|---|
| a. | प्रज्ञा पवार | i. | गोधड |
| b. | उषा हिंगोणेकर | ii. | अंतरंग |
| c. | वाहरु सोनवणे | iii. | मुद्रालेखन |
| d. | प्रकाश खरात | iv. | वणवा |
| | | v. | अनिकेत |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | iii | iv |
| (B) | iii | i | ii | v |
| (C) | ii | iii | i | v |
| (D) | v | iv | ii | iii |

**75.** गोविंद सी. रामटेके यांनी 'जनता' साप्ताहिकात दि. ५ नोव्हे १९३८ मध्ये प्रकाशित केलेली कथा कोणती ?

(A) मजुरी की मरण ?

(B) दुःखाच्या वणव्यात

(C) हंबरडा

(D) मोबदला

**Space For Rough Work**